३
पुणे
बुधवार
२७ मे
२००९

लोकमत
पुणे

# अभियांत्रिकी प्रवेशेच्छुकांसाठी संकेतस्थळ सुरू

पुणे, दि. २६ (प्रतिनिधी) : एम-पॉवर या करिअर मार्गदर्शन क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेमार्फत अभियांत्रिकी प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांकरिता 'गो टू इंजिनिअरिंग डॉट कॉम' www.go2engineering.com या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे.

या संकेतस्थळावर भविष्यातील संधीची माहिती प्रथमच खास मराठीमध्ये प्रस्तुत करण्यात आलेली आहे. भारताच्या सर्वांगीण प्रगतीकरिता केवळ मोजक्या शाखांमध्ये न धावता इतरही पर्यायांचा साकल्याने विचार व्हावा याकरिता ३० हून अधिक ब्रँचेसूची माहिती येथे देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी शिक्षण व्यवस्था, संस्था

*** अभियांत्रिकी शिक्षणसंस्थांची माहिती.**
*** प्रवेशप्रक्रियेचे संपूर्ण मार्गदर्शन.**

या बरोबरच प्रवेश प्रक्रियेसंदर्भात विनामूल्य मार्गदर्शनही या संकेत स्थळाद्वारे विद्यार्थी व पालक घेऊ शकतील. तसेच कॉलेज सिलेक्शन टूल, ब्रांच सिलेक्शन टूल उपयुक्त ठरतील, मागील वर्षाचे कट ऑफ मार्क्स् ही या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

या संकेतस्थळाची संकल्पना आवटे अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथील प्रशिक्षण अधिकारी प्रा. विजय नवले व एम-पॉवर संस्थेचे महेश नरके यांची आहे.

सकाळ : पुणे
गुरुवार, २८ मे २००९

# अभियांत्रिकी प्रवेशाविषयी नवे संकेतस्थळ सुरू

पुणे, ता. २७ : अभियांत्रिकीच्या प्रवेशप्रक्रियेविषयी संपूर्ण माहिती आणि मार्गदर्शन करणारे नवे संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे.

एम-पॉवर या संस्थेच्या वतीने महेश नरके व अ. गो. आवटे अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक विजय नवले यांनी तयार केले आहे. अभियांत्रिकीच्या तीस विद्याशाखा, तसेच प्रवेशप्रक्रियेची संपूर्ण माहिती व मार्गदर्शन या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. www.go2engineering.com या संकेतस्थळावर गेल्या वर्षीची गुणमर्यादाही (कटऑफ) उपलब्ध आहे.

Sakal Times
Thursday, June 4, 2009
www.sakaaltimes.com

# Website to help engineering aspirants

M-POWER, an organisation working in the field of career guidance, has launched a websites www.go2engineering.com to guide admission-seekers for the engineering courses in the state. The website will provide useful information on future scope in different engineering branches. Besides, the multiple round admission process has been explained in a simple manner, a press release said. Special tools like 'college selection tool' and 'branch selection tool' will be helpful for aspirants while filing option forms. The website has been developed by Vijay Navale, training and placement officer of A G Awate Engineering College and Mahesh Narke of M-Power, the release added.